पुणे महानगरपालिका

महिला व बाल कल्याण समिती

कार्यपत्रिका क्र. २३

महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार, दिनांक २८/३/२०१८ रोजी दुपारी ३=३० (साडे तीन ) वा. महात्मा ज्योतिबा फुले सभागृह (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र. २१५

मा.अब्दुल गफुर महंमद पठाण व मा.सौ.परवीन शेख यांचे दि. १९.३. २०१८ चे पत्र.

आपल्या पुणे महानगरपालिकेचे शहरात अनेक दवाखाने आहेत. या दवाखान्यांमध्ये सामान्य व गरीब कुटूंबातील नागरीक उपचार घेतात. अनेक दवाखान्यांमध्ये पुरुषांपेक्षा महिलांची संख्या जास्त असते. पुणे महानगरपालिकेचे वतीने या दवाखान्यांमध्ये फक्त महिलांच्या उपचारासाठी आठवड्यातील एक दिवस राखीव ठेवण्यात यावा . यादिवशी महिलांची आरोग्य तपासणी व उपचार करण्यासाठी स्त्रीरोग तज्ञ व स्पेशालिस्ट डॉक्टरांची नेमणूक त्या दिवशी करण्यात यावी. यामुळे त्या राखीव दिवशी जास्तीत जास्त महिला मनपाच्या दवाखान्यात तपासणी व पुढील उपचारांचा फायदा घेतील . तसेच यादिवशी महिलांसाठी विविध आजारांवरील विशेष तपासणी शिबिराचे आयोजन करणे शक्य होईल. यासाठी मनपाच्या सर्व दवाखान्यांमध्ये महिलाच्या तपासणी व उपचारासाठी आठवड्यातील एक दिवस राखीव ठेवण्यात यावा .

विषय क्र. २१६

मा.विशाल धनवडे व मा.सम्राट थोरात यांचे दि. २२.३. २०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेची शहरात विविध ठिकाणी आजार व रोगांचे निदान करणारी स्वतंत्र अशी रुग्णालये आहेत. पण कर्करोगाचे (Cancer ) रुग्णालय महापालिकेचे नसल्याकारणाने आणि सद्या कर्करोगांच्या रुग्णांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात असल्या कारणाने आपल्या पुणे महानगरपालिकेच्या वतीने स्वतंत्र कर्करोग रुग्णालय (Cancer Hospital ) उभे करण्यात यावे.

खात्याकडून पाठविलेले अभिप्राय

विषय क्र. २१७

पुणे मनपाचे राजीव गांधी हॉस्पिटलमध्ये कोठारी डायलसिस सेंटर व पुणे मनपाच्या संयुक्त विद्यमानाने अल्प दरात डायलेसिस सेंटर व पॅथोलॉजी लॅब सुरु करण्यबाबत मा.योगेश मुळीक व मा.सौ.श्वेता खोसे-गलांडे यांचे दिनांक ७/१२/२०१७ च्या पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती ठ.क्र.१५९,दिनांक ३/१/२०१८ ला अनुसरुन मा.महा .आयुक्त यांनी जा.क्र. मआ / एच.ओ./१२३८,दि.२०.३.२०१८ अन्वये पाठविलेला अभिप्राय विचारासाठी .

**<u>मागील सभेचे विषय</u>**

**<u>विषय क्र. २१८</u>**

**<u>मा. सौ.मानवी देशपांडे व मा.सौ.कविता वैरागे यांचे दि. ३.३.२०१८ चे पत्र</u>**

बिबवेवाडी सं.नं.५७२ येथील शौचालय रस्तारुंदीत बाधीत होत असल्याने सदर ठिकाणाहून शौचालय हलवून स.नं.५७७ ,खिंडीपाशी स्थलांतरीत करण्यात यावे .

**( टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते )**

**<u>विषय क्र. २१९</u>**

त्वचारोग तज्ञ,एडस,नोडल ऑफिसर,मेडिकल ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर, कार्डिओलॉजिस्ट / ह्रदयरोग तज्ञ, न्यायवैद्यकशास्त्र /वैद्यकीय अधिकारी (न्यायवैद्यकशास्त्र),नेत्र शल्यचिकित्सक/ नेत्रतज्ञ, रक्तसंक्रमण अधिकारी (वर्ग १) (वेतनश्रेणी–१५६००–३९१००+ ग्रेड पे ६६००) या पदावरील नेमणूकीबाबत मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र. मआ/ उआ (सा.प्र.) आस्था/७९३, दिनांक ९/१/२०१८ चे पत्र.

**( टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते )**

**<u>विषय क्र. २२०</u>**

पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी ), २८ क्वीन्स गार्डन, जुन्या सर्कीट हाऊसजवळ, पुणे ४११००१ यांचे संयुक्त सहकार्याने कौशल्य विकासाचे प्रशिक्षण आयोजित करणेबाबतचे मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/ स.वि.वि./ ८२८, दिनांक १६/१/२०१८ चे पत्र.

**( टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते )**

**<u>विषय क्र. २२१</u>**

पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग व मिटकॉन सेंटर फॉर सीएसआर ॲण्ड स्किल डेव्हलपमेंट, शिवाजीनगर, पुणे यांचे संयुक्त सहकार्याने कौशल्य विकासाचे प्रशिक्षण आयोजित करणेबाबतचे मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/स.वि.वि./८३०, दिनांक १६/१/२०१८ चे पत्र.

**( टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते )**

**<u>विषय क्र. २२२</u>**

पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग व श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (SNDT ) निरंतर व प्रौढ शिक्षण व विस्तार विभाग, पुणे उपकेंद्र कर्वे, पुणे ३८ यांचे संयुक्त सहकार्याने कौशल्य विकासाचे प्रशिक्षण आयोजित करणे बाबतचे मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/स.वि.वि./८३७, दिनांक १६/१/२०१८ चे पत्र.

**( टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते )**

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**